॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

# परिपत्रक

विषय : शै. वर्ष २०२७–२०२८ साठी नवीन विधी महाविद्यालयांचे प्रस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ व शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२५ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेबाबत.

संदर्भः १) या विभागाचे शैक्षणिक /संलग्न–०३/२०२६–२७/४८८ दि. ३१/०८/२०२६ रोजीचे विद्यापीठ संकेतस्थळावरचे जाहिर प्रगटण.

२) शासनाचे पत्र क्र. नामांत–२०२५/ई–११७९६८४/मशि–४ दि. २४/०८/२०२६

वरील विषयी व संदर्भीय पत्र क्र. १ नुसार बार काउन्सिल ऑफ इंडियाने (BCI), नवी दिल्ली त्यांच्या दि. १३/०८/२०२५ रोजीच्या प्रेस रिलिजनुसार, पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सबब, विस्तारीकरणांतर्गत विधी संदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना–हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणा–या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(३)(ग) नुसार स्विकारण्यात येणार आहेत असे कळविण्यात आलेले होते.

परंतु सोबत जोडलेल्या संदर्भीय पत्र क्र. २) नुसार पत्राद्वारे असे कळविण्यात आलेले आहे की, भारतीय विधिज्ञ परिषदेने दि. ५/०३/२०२६ रोजीच्या नोटीफीकेशनद्वारे सदर ३ वर्षाचा माराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. शै. वर्ष २०२७–२०२८ साठी विस्तारीकरणांतर्गत विधि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ तरतुदी व शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२५ मधील (New college Permission System-NCPS) या ऑनलाईन प्रणालीद्वारे विस्तारीकरणांतर्गत संलग्नीत विधी महाविद्यालयांनी अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी साठी अर्ज करू शकता याची नोंद घ्यावी.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२०२७/525
दिनांक :– १५/०९/२०२६

उपकुलसचिव
(शैक्षणिक संलग्नीकरण विभाग)

**प्रत माहितीस्तव:**

०१. मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

०२. मा. प्र. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

०७. सिस्टीम एक्सपर्ट शैक्षणिक(संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवुन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
कक्ष क्रमांक ४१८, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID: -mashi4-hted@mah.gov.in

**क्रमांक: नामांत-२०२५/ई-११७९६८४/मशि-४** **दिनांक:- स्वाक्षरीप्रमाणे**

प्रति,

कुलगुरू,

सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी नवीन विधी महाविद्यालयांचे प्रस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ व शासन निर्णय दिनांक १८.०९.२०२५ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ:-** १. बार कौन्सिल ऑफ इंडियाची दिनांक १३.०८.२०२५ ची Rules of Legal Education – Moratorium (Three – Year Moratorium), २०२५ संदर्भातील Press Release.
२. बार कौन्सिल ऑफ इंडियाची दिनांक ०५.०३.२०२६ चा Withdrawal of the Rules of Legal Education - Moratorium (Three – Year Moratorium), २०२५ and Adoption of Inspection – based Famework निर्णय.
३. ॲड. सदाशिवराव पाटील, मा.वि.स.स. यांचे दिनांक १८.०८.२०२६ रोजीचे निवेदन.

विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, भारतीय विधिज्ञ परिषद, नवी दिल्ली यांनी दिनांक १३.०८.२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पुढील तीन वर्षात नवीन विधि महाविद्यालयांना मान्यता देण्यात येवू नये. अस्तित्वात असलेल्या विधि महाविद्यालयात विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम/नवीन अतिरिक्त तुकडी यांना पुढील तीन वर्षात कोणतीही मान्यता देवू नये, अशा सूचना दिल्या होत्या.

२. वरील पार्श्वभूमीवर, शासनपत्र दिनांक १९.०९.२०२५ अन्वये सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले:

पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये या बार कॉन्सील ऑफ इंडिया यांच्या दि. १३.०८.२०२५ कौन्सिल ऑफ इंडियाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) सादर करणा-या संस्थांचेच प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम १०९(३) (ग) नुसार स्वीकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरात देताना नमूद करावी.

त्याचप्रमाणे अन्य शासन पत्र दिनांक १९.०९.२०२५ अन्वये विस्तारीकरणांतर्गत "विधी" अभ्यासक्रमासंदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, २०१६ च्या कलम १०९ (४) (ग) नुसार स्वीकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरातीत नमूद करावी, असे सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांना कळविण्यात आले होते.

३. उपरोक्तप्रमाणे सूचना निर्गमित केल्यानंतर नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (New College Permission System-NCPS) नवीन विधी महाविद्यालयांच्या प्रस्तावासंदर्भात बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र अपलोड करण्याकरिता टॅब उपलब्ध करून देण्यात आला. सबब, ज्या संस्थांकडे बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र आहे, केवळ अशाच संस्था नवीन विधी महाविद्यालयाकरिता अर्ज करू शकत होत्या.

४. आता, भारतीय विधिज्ञ परिषदेने दिनांक ०५.०३.२०२६ रोजीच्या नोटीफीकेशनद्वारे सदर ३ वर्षाचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता नवीन विधी महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत विधि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ तरतूदी व शासन निर्णय दिनांक १८.०९.२०२५ मधील कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Jayshree Jaideep Pawar
Date: 24-08-2026
16:02:33

**(जयश्री पवार)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. निवडनस्ती (मशि-४)